# SNDT WOMEN'S UNIVERSITY
# MUMBAI

## वृत्त प्रकाशन

## विद्यापीठ स्थापना दिवस २०१८

०५ जूलै, २०१८

मुंबई

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या २०१८ च्या स्थापना दिवसाच्या समारंभाची सुरूवात विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. शशीकला वंजारी यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यापीठाच्या कार्याचा आढावा घेतला आणि समारंभाला लाभलेल्या सर्व माननीय पाहुण्यांची ओळख करून दिली.

सभारंभाचे पाहुणे श्री. एच.आर. गायकवाड (अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, बी.व्ही.जी. भारत लि) यांनी विद्यापीठाच्या आमंत्रणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भारत विकास समुहाच्या स्थापना आणि उत्कर्षाची प्रेरक कथा सांगून त्यांनी ''आयुष्यात जे कराल ते सर्वोत्तम करा'' असा सल्ला विद्यार्थीनीनां दिला. यानंतर सभारंभाचे दुसरे पाहुणे श्री. सुधीर ठाकरसी (अध्यक्ष एमेरीटस हिंदुस्तान मील्स् लि.) यांनी श्रीमती प्रेमलीला ठाकरसी यांच्या चरित्रातील उद्बोधक आठवणी सांगितल्या आणि त्यांच्या सारखी निर्णय क्षमता व परिश्रमाची पराकाष्ठा विद्यार्थीनींनी अंगी बाणवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रथेनुसार या वर्षीही विद्यापीठाच्या २०१८ च्या स्थापनादिवसाच्या कार्यक्रमात ''महर्षी कर्वे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार'' डॉ. आशा मेनन (श्रीमती पी.एन.दोशी कॉलेज, घाटकोपर) यांना देण्यात आला आणि '' उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार'' श्रीमती अनिता बेरी शेटट्ी, (कनिष्ठ लिपीक, बी.एम.एन. कॉलेज ऑफ होम सायन्स, मांटुगा, मुंबई) यांना देण्यात आला. ''सर्वोत्तम महाविद्यालय पुरस्कार'' सेवा मंडळ एजुकेशन सोसायटीचे श्रीमती मणीबेन एम. पी. शहा महिला कॉलेज ऑफ आर्टस् आणि कॉमर्स, मांटुगा, मुंबई या महाविद्यालयाला देण्यात आला.

या समारंभात जादवपूर युनिर्वसिटी अॅलुमिनाय असोसिएशन ट्रस्ट तर्फे कुमारी प्रियंवदना येल्ला हिला शिष्यवृत्ती देण्यात आली. हया कार्यक्रमात मेजर (निवृत्त) शुभ्रा अग्रवाल, विग कमांडर निखिला पामकर, अॅड. निर्मला सामंत प्रभावळकर, कु. अनन्या प्रेम नाथ, कु. अंकिता जोशी या उल्लेखनीय माजी विद्यार्थीनींनीचा सत्कार करण्यात आला. २०१७ साली घोषित केलेल्या संस्थापक श्री. सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या स्मरणार्थ 'भाऊबीज निधी'' योजनेच्या पहिल्या पाच दात्यांचाही सत्कार करण्यात आला.

यानंतर समारंभाचे प्रमुख पाहुणे माननीय श्री. नितीनजी गडकरी (वहातूक आणि महामार्ग, नौकायन व जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुर्नजीवीकरण मंत्री, भारत सरकार) यांनी विद्यापीठाला स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि आपल्या भाषणतून शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाबरोबरच शिक्षणात गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न झाले पाहिजेत, जे भविष्यातील सुशिक्षीत व सुसंस्कृत नागरीक घडवतील अशी आशा व्यक्त केली. विद्यापीठाच्या विद्यार्थीनींमधुन भविष्यातील उत्तम नेतृत्व निर्माण होण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचाा समारोप डॉ. मीना कुटे, कुलसचिव (अतिरिक्त भार) यांच्या आभारप्रदर्शनाने झाला.